**जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी कार्यालय, नाशिक**

जिल्हाधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, गोल्फ क्लब मैदान, नाशिक - 422 001

दूरध्वनी: (०२५३) २३१७१०० । ई-मेल: collector.nashik@maharashtra.gov.in


# टेक्निकल असिस्टंट व मल्टीटास्किंग स्टाफ (MTS) पुरविणेसाठी ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत.

नाशिक जिल्हा स्तरावर व अधिनस्त कार्यालयात जनगणना-२०२७ कामाकरिता व जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर तसेच नगरपंचायत, नगरपरिषद स्तरावर टेक्निकल असिस्टंट (एकुण ३५) व मल्टीटास्किंग स्टाफ (MTS) (एकुण १) पुरविणेसाठी स्पर्धात्मक पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | अंदाजित रक्कम | १,१६,०९,०००/- (अक्षरी रुपये- एक कोटी सोळा लाख नऊ हजार रुपये मात्र) |
| २ | ई-निविदा फॉर्मेची किंमत (पावती जोडावी) | २०,०००/- (अक्षरी रुपये- वीस हजार रुपये मात्र ) |
| ३ | बयाना EMD रक्कम रुपये (पावती जोडावी) | २,००,०००/- (अक्षरी रुपये- दोन लाख रुपये मात्र) |
| ४ | सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई निविदा मंजूर झाले नंतर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी) | ३,५०,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख पन्नास रुपये मात्र ) |
| ५ | ई-निविदा ऑनलाईन स्विकृतीचा दिनांक व वेळ | दिनांक ०७/०५/२०२६ सायंकाळी ५.०० ते दिनांक २०/०५/२०२६ सायंकाळी ५.०० |
| ६ | ई-निविदा पूर्व बैठक (PTC) दिनांक व वेळ | दिनांक १२/०५/२०२६ सकाळी ११.०० वा. |
| ७ | ई-निविदा लिफाफा क्र. १ (ई-निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २०/०५/२०२६ सायंकाळी ५.३० वाजता किंवा तदनंतर |
| ८ | ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक |
| ९ | निविदा करार कालावधी | ३० जुन २०२७ |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी :-**

१) सदर निविदेच्या अटी व शर्ती https://mahatenders.gov.in/ या संकेतीय स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम सदर संकेतिक स्थळावरून ऑनलाईन भरून त्याची पावती स्कॅन करून अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करून Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करून Briefcase-I मध्ये अपलोड करावा.)

२) प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा, प्रधान जनगणना अधिकारी नाशिक यांनी स्वतः राखून ठेवले आहेत. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

३) सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी दिली जात नाही.

४) निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास III डीजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतिक स्थळावर स्वतः नाव नोंदवून करावी.

**(अ) तांत्रिक लिफाफा क्र. १**

लिफाफा क्र. १ तांत्रिक लिफाफ्यामध्ये निविदा, निविदा अर्जासह खालील स्वसाक्षांकित कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करून https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर Briefcase I मध्ये अपलोड करावेत. सदर लिफाफ्यामध्ये खालील नमूद केलेल्या बाबी सादर करणे अनिवार्य आहे.

१) एजन्सी क्र. नांव पत्ता फोन नं.

२) निविदा फॉर्म फी र.रु २०,०००/- (अक्षरी रुपये- वीस हजार रुपये मात्र) (ना परतावा) तसेच बयाना रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये- दोन लाख रुपये मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online Payment पद्धतीने करावे. सदर रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. सदर Online Payment ची पावती लिफाफा क्रमांक १ सोबत जमा करावी इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करणेत येणार नाही.

३) इसारा रक्कम भरण्यातून सूट असल्यास तसे दर्शविणारे पुराव्याचे कागदपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

४) व्यक्ती / संस्थेचे (जे लागू असेल ते) पॅनकार्ड प्रत सादर करावी.

५) निविदा धारकाने निविदे सोबत GST रजिस्टर केलेबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र छायांकित प्रत सादर करावी.

६) मागील लगतच्या वर्षाचा GST C.A चे क्लिअरन्स प्रमाणपत्र / ३B-GST / GST विभागाचे प्रमाणपत्र सादर करणे.

७) निविदाधारकाचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह) किंवा लघु उद्योग नोंदणी परवाना (छायांकित प्रत) सादर करणे आवश्यक.

८) कामगार भविष्य निर्वाह निधी १९५२ कायद्यांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.

९) कामगार भविष्य निर्वाह निधी भरणा केले बाबतची पावती / चलन - मागील ३ वर्षाचे फक्त मार्च चे २०२३, २०२४, २०२५

१०) राज्य कामगार विमा योजनेंतर्गत वैध नोंदणी प्रमाणपत्र.

११) राज्य कामगार विमा योजनेंतर्गत केलेली कपातीची भरणा केले बाबतचे चलन - मागील ३ वर्षाचे फक्त मार्च चे २०२३, २०२४, २०२५

१२) या पूर्वी शासकीय कार्यालयांना डेटा एन्ट्री ऑपरेटर्स पुरविलेबाबत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र कालावधीसह जोडणे आवश्यक आहे.

१३) सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करणे आवश्यक.

१४) निविदाधारकांनी त्यांच्या कडील उपलब्ध मनुष्यबळाची माहिती प्रपत्र १ मध्ये सादर करावी.

१५) निविदाधारकांनी मागील तीन वर्षांचा आर्थिक (२०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२०२५) सरासरी उलाढाल रु. ८० लाख पेक्षा अधिक असलेबाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र प्रपत्र २ मध्ये सादर करावे.

१६) निविदा धारकाने आरटीजीएस साठी Annexure (A) मध्ये भरलेली बँक खात्याची माहिती सादर करणे.

१७) निविदाधारकाने आपली संस्था / फर्म अगर कंपनी काळ्या यादीमध्ये समावेश नसल्याबाबतचा तसेच सदर संस्थेवर कोणतेही दावे चालू अगर प्रलंबित नसलेबाबतचे Annexure (B) सादर करावे.

१८) निविदाधारकाने वरील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे Annexure (C) प्रमाणे केलेले स्वयं घोषणापत्र सादर करावे.

१९) निविदाधारक कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकान्या समोर र.रु. ५००/- स्टॅम्पवर केलेले प्रतिज्ञापत्र.

२०) निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती स्वसाक्षांकित केलेल्या असल्या पाहिजेत.

२१) कागदपत्रे क्रमांकानुसार जोडणे आवश्यक.

**(ब) वाणिज्य लिफाफा क्र. २**

१) तांत्रिक अटी व शर्ती पूर्ण करणा-या निविदा धारकांचे वाणिज्य दरपत्रक ऑनलाईन पद्धतीने उघडणेत येतील.

२) व्यापारी लिफाफ्यातील दरतक्ता xls मध्ये तयार करून https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर Briefcase-II मध्ये अपलोड करावा.

३) सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४)ज्या निविदेत निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

५) डेटा एन्ट्री ऑपरेटर्स उपलब्ध करून देणेचा कालावधी निविदा मंजूर झाल्याच्या दिनांकापासून तेरा महिने राहील.

## (क) निविदासाठीचे निकष

ज्या निविदाधारकाच्या वाणिज्यिक निविदेतील एकत्रित दर न्यूनतम असेल अशा निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात येईल. जर एका पेक्षा जास्त निविदाधारकांनी व्यापारी लिफाफामध्ये नमूद केलेला दर समान असेल तर त्या निविदाधारकांमध्ये जो निविदाधारक स्थानिक असेल त्याला प्राधान्य दिले जाईल. जर समान दर असलेले निविदाधारक हे स्थानिक असतील तर ज्या निविदाधारकांचे उत्पन्न जास्त राहील त्याला प्राधान्य दिले जाईल.

## इतर अटी व शर्ती

१) सदरची निविदा ही जनगणना-२०२७ कामाकरिता व जिल्हास्तरावर व तालुकास्तर तसेच नगरपंचायत, नगरपरिषद एकूण टेक्निकल असिस्टंट उपलब्ध करून देणे यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नियुक्तीचे ठिकाण | मंजुर पदांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | तांत्रिक सहाय्यक | मल्टी टास्कींग स्टाफ |
| १ | तहसिल कार्यालय नाशिक | १ | ० |
| २ | तहसिल कार्यालय सिन्नर | १ | ० |
| ३ | तहसिल कार्यालय इगतपुरी | १ | ० |
| ४ | तहसिल कार्यालय त्र्यंबकेश्वर | १ | ० |
| ५ | तहसिल कार्यालय पेठ | १ | ० |
| ६ | तहसिल कार्यालय सुरगाणा | १ | ० |
| ७ | तहसिल कार्यालय कळवण | १ | ० |
| ८ | तहसिल कार्यालय मालेगांव | १ | ० |
| ९ | तहसिल कार्यालय, दिंडोरी | १ | ० |
| १० | तहसिल कार्यालय येवला | १ | ० |
| ११ | तहसिल कार्यालय नांदगांव | १ | ० |
| १२ | तहसिल कार्यालय निफाड | १ | ० |
| १३ | तहसिल कार्यालय चांदवड | १ | ० |
| १४ | तहसिल कार्यालय देवळा | १ | ० |
| १५ | तहसिल कार्यालय बागलाण | १ | ० |
| १६ | नगरपरीषद कार्यालय सिन्नर | १ | ० |
| १७ | नगरपरिषद कार्यालय इगतपुरी | १ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | नगरपरिषद कार्यालय त्र्यंबकेश्वर | १ | ० |
| १९ | नगरपंचायत कार्यालय, पेठ | १ | ० |
| २० | नगरपंचायत कार्यालय, सुरगाणा | १ | ० |
| २१ | नगरपंचायत कार्यालय, कळवण | १ | ० |
| २२ | नगरपंचायत कार्यालय, दिंडोरी | १ | ० |
| २३ | नगरपरिषद कार्यालय येवला | १ | ० |
| २४ | नगरपरिषद कार्यालय नांदगांव | १ | ० |
| २५ | नगरपंचायत कार्यालय, निफाड | १ | ० |
| २६ | नगरपरिषद कार्यालय चांदवड | १ | ० |
| २७ | नगरपंचायत कार्यालय, देवळा | १ | ० |
| २८ | नगर परिषद कार्यालय सटाणा | १ | ० |
| २९ | नगर परिषद कार्यालय मनमाड | १ | ० |
| ३० | नगर परिषद कार्यालय भगुर | १ | ० |
| ३१ | नगर परिषद कार्यालय ओझर | १ | ० |
| ३२ | नगर परिषद कार्यालय पिंपळगांव बसवंत | १ | ० |
| ३३ | छावणी परिषद कार्यालय देवळाली | १ | ० |
| ३४ | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक (जिल्हा स्तर) | १ | |
| ३५ | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक (जिल्हा स्तर) | १ | १ |
| | एकुण | ३५ | ०१ |

२) नियुक्त केलेल्या उमेदवारांना संबंधित तालुका स्तरावरील किंवा नगरपालीका / नगरपरिषद कार्यालयात काम करणे बंधनकारक राहील. सदर उमेदवारांनी सकाळी ९.४५ ते ६.१५ पर्यंत ऑफिस वेळेत नियमित येणे बंधनकारक राहील. साप्ताहीक सुटटी रविवार राहील. परंतु जनगणनेचे काम विहीत टप्प्यांत पुर्ण होण्याचे दृष्टीने सदरचे कामकाजासाठी साप्ताहीक सुटटी रविवारी तसेच सार्वजनिक सुटटयांच्या दिवशी तसेच वेळ प्रसंगी कार्यालयीन वेळेनंतर पण उपस्थित राहणे बंधनकारक राहील. तथापी सुटटीच्या दिवशी उपस्थित राहिलेबाबतचा स्वतंत्र भत्ता अनुज्ञेय नाही. नियुक्ती ही केवळ दिनांक ३०/०६/२०२७ पर्यंत असेल.

३) संस्थेमार्फत नेमेलेले संस्थेचे कर्मचारी यांना नेमलेल्या पदावर काम केल्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारे शासनाचे अथवा जिल्हाधिका-यांच्या आस्थापनेवर नियुक्ती मिळणार नाही किंवा ते या आस्थापनांवर हक्क प्रस्थापित करु शकणार नाहीत याची पुर्वकल्पना संबंधित संस्थेने त्यांच्या कर्मचा-यास लेखी स्वरुपात देवून त्यांची लेखी संमती घेणे बंधनकारक राहील.

४) संस्थेमार्फत नेमलेले कर्मचारी यांनी कोणतीही गैरवर्तणूक केल्यास किंवा दैनंदिन कामकाजात अकार्यक्षमता दिसुन आल्यास त्यास कामावरुन कमी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहील व त्याविरुध्द कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

५) संस्थेमार्फत नेमलेल्या कर्मचारी यांनी काम सोडण्यापुर्वी १ महिना नोटीस देणे बंधनकारक राहील. कर्मचा-यांचे काम अकार्यक्षम असल्यास सदर कर्मचा-या ऐवजी अन्य पात्रता धारक कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

६) जनगणना विषयक नेमुन दिलेले कामकाजाचे आदेश संस्थेने पारीत करावेत.

७) नियुक्त करण्यात येणारा उमेदवार हा किमान पदवीधर व MSCIT अथवा समकक्ष पात्रता तसेच जनगणना विषयक कामे योग्यरित्या पार पाडता येणे आवश्यक आहे. पात्रतेच्या अधिन राहुन सेवानिवृत्त सरकारी अधिका-यांचाही विचार केला जाऊ शकतो.

८) नियुक्ती पुर्णपणे अल्पकालीन करार तत्वावर असेल. नियुक्त कर्मचा-यांना (तांत्रिक सहाय्यक किंवा एमटीएस) नियमितीकरण किंवा कोणत्याही पदावर पुढील नियुक्तीच्या विचाराच्या दृष्टीने कोणत्याही दाव्यांचा, हक्कांचा, हितांचा किंवा पुढील लाभांचा अधिकार असणार नाही, ज्यात शासनातील कोणत्याही अनौपचारिक, अ‍ॅड-हॉक, तात्पुरत्या किंवा नियमित सेवेसाठीच्या कोणत्याही दाव्यांचा समावेश आहे.

९) निविदाधारक स्वतः त्यांची संस्था अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसावा. किंवा राजकीय पक्षाचा / पुढा-याचा हितचिंतक किंवा पाठीराखा म्हणून ज्ञात नसावा, असे असल्याचे निदर्शनास आलेस कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्यात येईल.

१०) कामाचा कालावधी मंजुरीच्या आदेशापासून तेरा महिने इतका राहील. तथापि १३ महिन्यांनंतर नवीन पुरवठाधारकाची नियुक्ती प्रशासकीय कारणास्तव न झालेस याच निविदाधारकास नवीन पुरवठाधारकाची नियुक्ती होईपर्यंत (कमाल ६ महिने पर्यंत) स्विकृत निविदेतील दराप्रमाणेच काम चालू ठेवावे लागेल. किंवा १३+ महिन्यापूर्वी मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशाने काम बंद करण्यात येईल.

११) शासकीय सुट्टीच्या दिवशी आवश्यकतेनुसार व आदेशानुसार मनुष्यबळ पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१२) सदरचे काम करीत असताना जिल्हाधिकारी / अधिनस्त कार्यालयातील शिस्त व नियमांना कोणतीही बाधा येणार नाही. याची दक्षता निविदाधारक यांचेवर राहील.

१३) कामाबाबत काही तक्रार आलेस अथवा अनियमितता आढळून आलेस सदरचा आदेश कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करणेत येईल.

१४) निविदेतील समाविष्ट कामात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास त्याचे त्या कालावधीतील देयक नाकारले जाईल व प्रतिदिनी १,०००/- रुपये प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१५) निविदा धारकास या कार्यालयाने सूचना दिल्याप्रमाणे वेळेत मागणी प्रमाणे टेक्निकल असिस्टंट तात्काळ उपलब्ध करून द्यावे लागतील.

१६) संबंधित तालुक्याचे तहसिल कार्यालय, नगरपरिषद व नगरपंचायत या ठिकाणी मुख्याधिकारी नियंत्रक टेक्निकल असिस्टंट च्या कामकाजावर पर्यवेक्षण करतील.

१७) टेक्निकल असिस्टंट ऑपरेटरला मराठी इंग्रजी भाषेत टंकलेखनाचा अथवा डिजीटर अॅल्पीकेशन अनुभव आवश्यक आहे. तसेच त्याला डाऊनलोडिंग, इंटरनेटचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने उत्कृष्टरित्या काम करणे आवश्यक राहील.

१८) निविदा धारकास सर्व टेक्निकल असिस्टंट ऑपरेटरना दिलेले काम समाधानकारकरित्या व विहित मुदतीत पूर्ण केल्या बाबतीचे प्रमाणपत्र टेक्निकल असिस्टंट ऑपरेटर निहाय संबंधित तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांचे कडून दरमहा घेऊन सादर करावे लागेल त्यानंतर देयकाची अदायगी उपलब्ध निधीनुसार करणेत येईल.

१९) नेमलेला एखादा टेक्निकल असिस्टंट ऑपरेटर कामाच्या स्वरूपानुसार अकार्यक्षम आढळल्यास त्यास त्वरित बदलून त्याच्या ज़ागी पर्यायी डेटा टेक्निकल असिस्टंट तात्काळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

२०) सदर टेक्निकल असिस्टंट व मल्टी टास्कींग स्टाफ यांची नियुक्ती केवळ दिनांक ३०/०६/२०२७ पर्यंत असेल.

२१) निविदा धारकाने पुरविलेल्या टेक्निकल असिस्टंट ऑपरेटरच्या कामाचा मोबदला महिन्यातील प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसाच्या आधारे (हजेरीपटाच्या आधारे ) अदा केला जाईल. त्याकरिता मंजूर मासिक दर वापरला जाईल. मंजूर मासिक दर त्या महीन्याच्या दिवसाप्रमाणे असेल.

२२) जर एका पेक्षा जास्त निविदाधारकांनी व्यापारी लिफाफामध्ये नमूद केलेला दर समान असेल तर समान दर असलेले निविदाधारकांमध्ये जो निविदाधारक स्थानिक असेल त्याला प्राधान्य दिले जाईल. निविदाधारक हे स्थानिक असतील तर ज्या निविदाधारकांचे उत्पन्न जास्त राहील त्याला प्राधान्य दिले जाईल.

२३) वस्तू व सेवा कर, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा प्रचलित नियमानुसार नमूद करणे अनिवार्य आहे.

२४) भारत सरकार वित्त मंत्रालय यांचे प्रचलित नियमानुसार देयकातून आयकर TDS व GST-TDS कपात करणेत येईल. इतर सर्व कर सेवा व वस्तू कर इ. सारखे कर भरण्याची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

२५) अनामत भरलेली रक्कमेची बँक गॅरंटी काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतरच परत देणेत येईल. सदर कामकाजात काही त्रुटी असलेस अथवा काम समाधानकारक नसलेस अनामत रक्कम परत केली जाणार नाही. सदर रक्कम जप्त केली जाईल.

२६) निविदा मंजूर होणाऱ्या अभिकर्त्यांस निविदा मंजूर झालेपासून ७ दिवसाचे आत विहीत रक्कमेच्या स्टॅम्पवर अटी व शर्तीबाबत करारपत्र जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे सादर करावे लागेल.

२७) ऑनलाईन भरलेली बयाणा रक्कम ई-टेंडर प्रक्रिया पूर्ण झालेनंतर संबंधिताच्या खात्यावर परत जमा होणार आहे.

२८) निविदामध्ये भरलेले दर कामकाज पूर्ण होईपर्यंत बंधनकारक राहतील.

२९) निविदा मंजूर झालेल्या निविदा धारकास ७ दिवसाच्या आत अनामत रक्कम ३,५०,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख पन्नास हजार रु. मात्र) कोणत्याही अनुसूचित वाणिज्यिक बँक / राष्ट्रीयकृत बँकेतील कराराच्या कालावधीत वैध राहणा-या बँकेच्या हमीवारे (शासन निर्णय दिनांक-०१/१२/२०१६ चे परिशिष्ठ-१०) District Census Officer Nashik या नावे जमा करावी लागेल.

३०) निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचे किंवा निविदा पूर्णत: / अंशत: रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचे राहतील.

३१) कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी नाशिक यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. तसेच निविदा संदर्भातील कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वाद / न्यायालयीन वाद उद्भवल्यास मा. जिल्हा न्यायालय नाशिकच्या कार्यक्षेत्रामध्ये घालवण्यात येईल.

३२) सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्ती मध्ये कोणतीही कारणे न देता व कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा राखून ठेवणे तसेच त्यामध्ये सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी नाशिक यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

३३) प्राप्त निविदा स्विकारणे अथवा नामंजूर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याबाबतचा सर्व अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

३४) निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्यास सदर निविदा अंतिम झालेल्या दराने दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास देण्यात येईल व L१ ने सुरुवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकार जमा करण्यात येईल व संबंधित निविदाधारकास काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.

३५) लेखा परीक्षणातील तपासणीमध्ये तपासणी पथकाने शोधलेल्या मुद्दा (Audit Para) अंतर्गत रक्कमेची संपूर्ण वसुली निविदाधारकास देणे बंधनकारक राहील.

३६) निविदासंबंधातील सर्व सूचना या https://mahatenders.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येतील. याबाबत व्यक्तिगत पूर्व सूचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

३७) साखळी पद्धतीने ई-निविदा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित निविदाधारक यांना Black list करण्यात येईल व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

३८) निविदेमध्ये प्रत्येक बाबीचा एकच दर व त्यांची माहिती सुस्पष्टपणे नमूद करावी. एकापेक्षा जास्त दर किंवा दर्शविलेल्या दरांमध्ये खाडाखोड करू नये. जर निविदेमध्ये माहिती व दरात खाडाखोड केल्यास त्या निविदेचा विचार केला जाणार नाही, तसेच निविदेमध्ये सादर केलेले दर हे सर्व करांसहित सादर केलेले असावेत.

३९) निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबंधीच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरविण्यास एखाद्या व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबंधीचे निविदाधारकांचे प्राधिकारपत्र (Bidders Power of attorney) देणे आवश्यक राहील.

४०) कर्तव्य कालावधीमध्ये मनुष्यबळ अथवा मनुष्यबळास अपघातामुळे वा इतर कोणत्याही कारणास्तव अपघात, दुखापत व नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही निविदाधारकाची राहील. याबाबतीत

कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयातर्फे देण्यात येणार नाही. तसेच काम करत असताना होणाऱ्या मालमत्तेच्या हानीची नुकसानीची देखील जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची राहील याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

४१) निविदाधारकांना निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी शर्ती व नियम या व्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ट करु नये, अशा पद्धतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४२) मंजूर निविदाधारकांस कामासाठी कोणत्याही प्रकारचे अग्रीम मिळणार नाही, निविदाधारकांना सादर केलेल्या देयकानुसारच शहानिशा करून जी रक्कम देय राहील ती आदा केली जाईल.

४३) निविदाधारक / संस्था यांना शासकीय / निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळ्या यादीत घोषीत केलेले असल्यास अशा निविदा धारक / संस्था यांनी निविदा भरू नयेत, असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही, किंवा अशा निविदाधारकांची निविदा मंजूर झालेली असल्यास रद्द करण्यात येईल.

४४) निविदेतील कोणत्याही अटी व शर्ती मधील संपूर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित निविदाधारक प्रचलित नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

४५) निविदाधारकसंस्था/ व्यक्तींनाकामानवेतनकायदा (उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक ०६/०३/२०२५), व इतर लागू कायदे व त्यातील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील तसेच निविदा कालावधीत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश परिपत्रके इत्यादींचे पालन करणे आवश्यक राहील.

**जनगणना-२०२७ परिपत्रक क्र. ३ अन्वये अतिरिक्त अटी व शर्ती**

(DCO-StateCoordination/Census/२०२७, दिनांक ०५.०१.२०२६ नुसार)

**मनुष्यबळ मर्यादा व रचना**

४६) जनगणना कार्यालय, महाराष्ट्र यांच्या परिपत्रक क्र. ३ नुसार जिल्हा स्तरावर कमाल २ टेक्निकल असिस्टंट व १ MTS, नगर महापालिका स्तरावर २ टेक्निकल असिस्टंट व १ मल्टी टास्कींग स्टाफ, तर प्रत्येक चार्ज स्तरावर १ टेक्निकल असिस्टंट याप्रमाणे मनुष्यबळ मर्यादित असेल. निविदाधारकाने या मर्यादेनुसारच मनुष्यबळ पुरवठा करणे बंधनकारक राहील.

**मानधन मर्यादा**

४७) शासन निर्णयाप्रमाणे टेक्निकल असिस्टंटसाठी कमाल मासिक मानधन रु. २५,०००/- व मल्टी टास्कींग स्टाफ साठी रु. १८,०००/- इतके असेल. यापेक्षा अधिक दर दिल्यास केंद्र शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती होणार नाही व सदर अतिरिक्त रक्कम संबंधित निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

**कालावधी व समाप्ती**

४८) या निविदेअंतर्गत मनुष्यबळ पुरवठ्याचा जुन-२०२६ ते जुन-२०२७ कालावधी १३ महिने इतका राहील. सदर कालावधी पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाचे कोणतेही आर्थिक दायित्व राहणार नाही; त्यानंतर सर्व देयकांची जबाबदारी ही राज्य / जिल्हा स्तरावर राहील.

**डिजिटल क्षमता**

४९) नियुक्त टेक्निकल असिस्टंट हे जनगणना-२०२७ साठी वापरण्यात येणाऱ्या मोबाईल ॲप्लिकेशन व CMMS (Census Management and Monitoring System) पोर्टलवर काम करण्यास सक्षम असणे अनिवार्य आहे. निविदाधारकाने नियुक्तीपूर्वी संबंधित उमेदवारांची डिजिटल साक्षरता सुनिश्चित करावी.

**कंत्राटी स्वरूप व नियुक्ती प्रक्रिया**

५०) परिपत्रक क्र. ३ मधील तरतुदीनुसार सर्व मनुष्यबळ हे केवळ अल्पकालीन करारपद्धतीने (Short-term Contractual Basis) नियुक्त करण्यात येईल. नियुक्त कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमितीकरण, कायमस्वरूपी नियुक्ती अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या लाभाचा दावा करता येणार नाही. यासंदर्भात कोणताही दावा उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.

**EPF/ESIC कपात**

५१) नियुक्त सर्व टेक्निकल असिस्टंट व MTS यांचे EPF (Employee Provident Fund) व ESIC (Employee State Insurance Corporation) कपात लागू नियमांनुसार करणे व संबंधित खात्यात जमा करणे ही जबाबदारी पूर्णतः निविदाधारकाची राहील. याबाबत देयक सादर करताना संबंधित महिन्याचे EPF/ESIC भरणाचे चलान सादर करणे बंधनकारक राहील.

**प्रशिक्षणात सहभाग**

५२) नियुक्त टेक्निकल असिस्टंट यांनी जन ाणना विभागाने आयोजित केलेल्या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये अनिवार्यपणे सहभागी व्हावे लागेल. प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्यास संबंधित दिवसांचे मानधन कपात केले जाईल. प्रशिक्षण भत्ता हा केंद्र शासनाच्या निर्धारित दराप्रमाणेच देय राहील.

**IT पायाभूत सुविधांचा वापर**

५३) जिल्हा स्तरावर जनगणना-२०२७ साठी मंजूर IT पायाभूत सुविधा ( संगणक, प्रिंटर, UPS, इंटरनेट कनेक्शन इ.) च्या देखरेखीस व दैनंदिन वापरास टेक्निकल असिस्टंट जबाबदार राहतील. सदर सुविधांचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई निविदाधारकाकडून करून घेण्यात येईल.

**त्रैमासिक खर्च विवरण**

५४) परिपत्रक क्र. ३ मधील परिच्छेद ७ नुसार जिल्हा जनगणना अधिकारी कार्यालयाने जनगणना कामावरील सर्व खर्चाचे संपूर्ण व योग्य हिशोब ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार निविदाधारकाने दरमहा व त्रैमासिक खर्चाचे प्रमाणित विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. असे विवरण सादर केल्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

**निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती**

५५) परिपत्रक क्र. ३ मधील तरतुदीनुसार टेक्निकल असिस्टंट पदासाठी निवृत्त शासकीय कर्मचारी / अधिकारी यांचाही विचार करता येईल. मात्र अशा व्यक्ती संबंधित कामासाठी योग्य व सक्षम असल्याची खात्री निविदाधारकाने करावी.

**देयक सादर करताना आवश्यक कागदपत्रे**

५६) मंजूर निविदाधारकांस महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/कामगार-८, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ नुसार सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या कामाच्या दिवसानुसार दर महा ५ तारखेपर्यंत कंत्राटदाराने संबंधित कर्मचाऱ्याचे कराराचानुसार वेतन व भत्ते अनुज्ञेयतेनुसार बँक खात्यामध्ये जमा करणे तसेच, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वैधानिक देणी / बजावटी कापून घेवून त्या संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वैधानिक देणी जमा करण्याच्या खात्यांमध्ये (PF, ESIC, PT) जमा करणे बंधनकारक राहील. तसेच निविदाधारक यांनी सदर शासन निर्णयातील "जोडपत्र अ" मधील अटी शर्तीस अधीन राहून कामकाज करणेचे आहे.

५७) मंजूर निविदाधारक यांनी देयक एकूण प्रदान केलेले वेतन, सेवाशुल्क व अन्य करांसह खालील कागदपत्रे सोबत जोडून सादर करणे बंधनकारक राहील.

A. एकत्रित देयक,

B. नाव व पदनामासह कर्मचाऱ्यांचे वेतन व वैधानिक देण्यांसह तपशील,

C. उपस्थितीबाबतचा तपशील,

D. भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा योजना (ESIS) / कर्मचारी नुकसान भरपाई (W.C.) व व्यावसायिक कर (P.T.) आदा केल्याच्या पावत्या,

E. एकत्रीत वेतनचिठ्ठ्या..

५८) मंजूर निविदा धारक यांनी प्रथम देयक सादर करते वेळी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपत्राची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५९) जनगणना बाबत जनगणना कार्य निदेशालय, मुंबई (D.C.O.) कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचना निविदा धारक यांना बंधनकारक राहतील.

**दिनांक :-** ०५ /०५ /२०२६
**ठिकाण :-** **नाशिक**

(आयुष प्रसाद, भा.प्र.से.)
**मा.जिल्हाधिकारी नाशिक तथा,**
**प्रधान जनगणना अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

Signature Not Verified
Digitally signed by PRADEEP GOPINATH VARPE
Date: 2026.05.07 15:32:26 IST
Location: Maharashtra-MH